# डॉ. चिद्रावार यांना मिळाले रसायनशास्त्र विषयातील पेटंट

देगलूर, ता.३० (बातमीदार) : देगलूर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा रसायनशास्त्र विभाग व संशोधन केंद्र प्रमुख डॉ. अनिल भागवतराव चिद्रावार यांच्या संशोधन कार्याला पेटंट प्राप्त झाले आहे. त्यांनी 'डिप लर्नींग बेस्ड अ‍ॅप्रॉच टू अ‍ॅनलाईज द अ‍ॅटोमीक स्ट्रक्चर अ‍ँड केमीकल मेक ऑफ व्हेरीअस पॉलीमर्स अलोंग विथ देअर बायोलॉजीकल डिटेल्स' या विषयावर केलेले संशोधन कार्यास पेटंट कार्यालयाने मान्यता दिली आहे. नुकतेच कोलकत्ता येथील पेटंट कार्यालयाने (ता.२३) सप्टेंबर रोजी संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध केली असून त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन केले जात आहे. उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार यांचे अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व राजकुमार महाजन, डॉ.कर्मवीर उंग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्र द्याडे, देवेंन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, डॉ. मोहन खताळ, निवृती गोविंदवार, प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आभिनंदन केले आहे.



अनिल चिद्रावार

Scanned with OKEN Scanner